# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक ९

जा.क्र.झोपुप्रा/अजि/२२२
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : ६.१.१९९८

## परिपत्रक

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजना
योजनेत सहभागी न होणाऱ्या झोपडीधारकांविरुध्द करावयाची कारवाई.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टयांच्या विकासाठी निरनिराळया सहकारी गृहनिर्माण संस्थांना आवश्यक ते परवाने या प्राधिकरणाकडून देण्यात आले आहेत. ज्या योजनांमधील ७०% झोपडीधारक योजनेत सामील होण्याची संमती देतील अशा योजनांना मान्यता देण्यात येते. आवश्यक ते परवाने प्राप्त झाल्यावर जेव्हा प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्याची वेळ येते त्यावेळी जे झोपडीधारक पुनर्वसन योजनेत सामील होत नाहीत त्यांच्याकडून अडथळा निर्माण करण्यात येऊन ते झोपडी रिकामी करुन देण्यास तयार होत नाहीत. त्याचप्रमाणे काही झोपडीधारकांनी योजनेस संमती दिलेली असते परंतु करारनामा करून झोपडी रिकामी करुन देण्यास टाळाटाळ करतात. या अडचणींमुळे विकासयोजनेस अडथळा निर्माण होऊन इमारतींचे बांधकाम सुरू होऊ शकत नाही. अशा असहभागी झोपडीधारकांविरूध्द कारवाई करण्याची तरतूद महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ तसेच विकास नियंत्रण नियमावली १९९१ चे कलम ३३(१०) मध्ये करण्यात आली आहे. असहभागी झोपडीधारकांविरुध्द कारवाई करण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्था /विकासक यांच्याकडून विनंती करण्यात येते. परंतु अशी कारवाई करण्यापूर्वी संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्था /विकासक यांनी वर नमुद केलेल्या नियमातील बाबीची प्रथम पुर्तता करणे आवश्यक असते. यास्तव असे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. प्रस्तावीत पुनर्वसन योजनेत सर्व पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन करण्याची तरतुद करण्यात यावी. यामध्ये असहभागी पात्र झोपडीधारकांचाही समावेश असेल.
२. प्रत्येक असहभागी झोपडीधारकास, योजनेत सामील झालेल्या झोपडीधारकांप्रमाणेच पुनर्वसन सदनिका /संक्रमण शिबीरात कोठे जागा / गाळा देण्यात येणार आहे त्याचा तपशील लेखी कळविण्यात यावा.
३. वरील प्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मान्यता मिळाल्यापासून १५ दिवसात असहभागी झोपडीधारक योजनेत सामील न झाल्यास त्यानंतर महाराष्ट्र झोपडपट्टी (स.नि.प.) अधिनियम, १९७१ चे कलम ३३ व ३८ अनुसार कारवाई करुन झोपडया काढून टाकण्यात येतील.
४. वरील प्रमाणे झोपडया काढून टाकण्यात आल्यावर संबंधित झोपडीधारक संक्रमण शिबीरासाठी पात्र रहाणार नाहीत तसेच त्यानंतर सोडतीद्वारे पुनर्रचित सदनिकांकरिता ते पात्र रहाणार नाहीत. परंतु इतरांची निवड करुन शिल्लक राहिलेल्या सदनिकेकरिता पात्र राहतील. मग त्या सदनिका त्याच किंवा इतर कोणत्याही जागेवर असतील.

५. जर असहभागी झोपडीधारक प्रकल्पाला बांधकाम परवानगी देईपर्यंत सहभागी झाले नाहीत तर ते कोणत्याही बांधलेल्या सदनिकांचे हक्क संपूर्णपणे गमावतील.

यास्तव सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था / विकासक यांना विनंती करण्यात येते की, असहभागी झोपडीधारकांविरुध्द कारवाई करण्याचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यापूर्वी वरील क्र. १,२ व ३ कडील बाबींची पुर्तता करावी तसेच या कार्यालयास प्रस्ताव सादर करताना खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१. वरील प्रमाणे असहभागी झोपडीधारकांना लेखी सुचना दिलेल्या पत्राची सत्यप्रत व झोपडीधारकांना सदरहू सुचना मिळाल्याची पोच पावती.
२. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मान्यता मिळालेले कागदपत्र. उदा. LOI, IOA.
३. झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेले परिशिष्ट -२.
४. असहभागी सभासद झोपडीधारकांना देण्यात येणाऱ्या संक्रमण शिबीराचा तपशील.

सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था / विकासक यांनी असहभागी झोपडीधारकांविरूध्द कारवाई करण्याचे प्रस्ताव सादर करण्यापूर्वी वरील बाबींची पूर्तता केल्यास शीघ्र कारवाई करण्यास मदत होईल.

सही/
अप्पर जिल्हाधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण